REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2024

# स्वातंत्र्योत्तर मुस्लिम समाज – एक अभ्यास

डॉ. वसंत गायकवाड
सी.जे.पटेल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,तिरोडा.
जिल्हा– गोदिंया,(महाराष्ट्र)



भारत हे धर्मनिरपेक्ष, समाजवादी राष्ट्र आहे. या राष्ट्रात हिंदू, मुस्लिम, शीख, इसाई, बौद्ध, जैन इतदी धर्मांचे लोक अनेक शतकांपासून गुण्यागोविंदाने राहात आहेत. धार्मिक विविधतेतील ही एकताच भारताचे बलस्थान आहे. भारतीय संविधानाने देशाच्या प्रत्येक नागरिकाला समानेतची ग्वाही दिली आहे. धर्म, जात, पंथ, भाषा या आधारावर कुठल्याही नागरिकाचे शोषण होणार नाही, याची खबरदारी संविधानाने घेतलेली आहे. त्याबरोबरच भाषा, धर्म आणि संस्कृतीची जोपासना करण्याची हमीही दिलेली आहे.

एकशे एकवीस कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या भारतात सर्वांत मोठा अल्पसंख्याक समाज म्हणजेच मुस्लिम समाज होय. 2011 च्या जनगणनेनुसार ''Islam is the second largest religion in india after Hinduism. Muslims are the second largest community after Hindus forms 14.6% of the total population in republic of India .''[1] भारताच्या लोकसंख्येत मुस्लिम लोकसंख्या जवळपास 18 कोटी आहे. भारतातील ख्रिश्चन, बौद्ध, जैन, शीख या अल्पसंख्याक समाजाची मुस्लिम समाजाशी तुलना करताना जाणवते की, आर्थिक, सामाजिक आणि शैक्षाणिक प्रगती करण्यात हा समाज मागे राहिलेला आहे. हा विरोधाभास दूर करून मुस्लिम समाजाची प्रगती एकूण भारतीय समाजाच्या आणि पर्यायाने देशाच्या प्रगतीसाठी अनिवार्य आहे. मुस्लिम आणि इतर धर्मीय अल्पसंख्याक यांच्यात सहकार्याचे आणि सलोख्याचे संबंध निर्माण करण्यासाठीही हे अत्यावश्यक आहे.

भारत 15 ऑगस्ट 1947 ला स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात आले. या आनंदाच्या क्षणाला फाळणीने गालबोट लावले. वास्तविकता फाळणी ही हिंदू–मुस्लिम समाजातील उच्चवर्णीय आणि सरंजामदारांच्या राजकारणाची फलश्रुती होती. यात मुस्लिम राजकारण्यांनी 'पाकिस्तान' हा मुस्लिमांच्या सर्व समस्येवर एकमेव उपाय आहे अशी सर्वसामान्य मुस्लिमांची मानसिकता तयार केली. फाळणीच्या काळात दहशतीच्या वातावरणात जे मुसलमान पाकिस्तानात गेले ते जमीनदार, व्यापारी, नोकरशहा असे समाजाच्या वरच्या स्तरातील होते. जे पाकिस्तानात जाऊ शकले नाही ते खालच्या स्तरातील गरीब मुसलमान होते. यात लहान शेतकरी, शेतमजूर, कारागीर यांचा समावेश होतो. म्हणूनच भारतात जवळपास ''15 करोड आम मुसलमानो की आबादी है, जो छोटे तबके या जातियों और व्यवसायो से संबंध रखते है; इसलिए उनको मुस्लिम आबादी का बहुसंख्याक कहां जा रहा है।''[2] या बहुसंख्याक मुस्लिम समाजात छोटे–छोटे दुकानदार, कारागीर, मांस व सब्जी विक्रेता, दस्तकार न्हावी, मोटार–वाहन दुरुस्ती करणारे, दूध विक्री करणारे लहान व्यावसायिक अशा सर्वसामान्य गरीब माणसांचा मोठा भाग आहे. आधुनिक शिक्षणापासून दूर असलेला, अशिक्षित, वडिलोपार्जित व्यवसाय करणारा असा हा मोठा समूह आहे.

भारत आणि पाकिस्तानच्या फाळणीला सर्वसामान्य मुसलमानच जबाबदार धरला जातो. वास्तविकता ही आहे की, ''हा समाज अतिशय दबलेल्या अवस्थेत होता. त्यांच्या पुढाऱ्यांनी त्यांना निर्णायकी अवस्थेत सोडून पाकिस्तानला स्थलांतर केले होते.''[3] मुस्लिम समाजातील प्रभावी गट पाकिस्तानात गेला आणि दुर्बल बहुसंख्याक

असा मोठा भाग भारतातच स्थिरावला. स्वाभाविकच फाळणीनंतर भारतात राहिलेले मुसलमान दुर्बल, असमर्थ, गरीब अशाच स्वरूपाचे होते. फाळणीच्या वेळी मुसलमानांनी केलेल्या कत्तलीमुळे हिंदू समाजाच्या मनात त्यांच्याविषयीची द्वेषभावना होती. '' भारतात एकही मुसलमान राहू नये, राहिला तर त्यालाही पाकिस्तानात पाठवावे. तुम्हालाच पाकिस्तान हे नवीन राष्ट्र म्हणून हवे होते ना? मग तिकडेच जा!'[4] अशी हिंदूंची मानसिकता तयार झाली. ही मानसिकता अजूनही कायम दिसते. हा भूतकाळच नव्या समस्या जन्माला घालताना दिसतो. इस्लामबद्दलची भावना यामुळे दूषित होते. मुस्लिमांकडे संशयाच्या नजरेने बघितले जाते. त्यांच्या राष्ट्रप्रेमावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात येतात. त्यांना उपरे ठरविण्यात येतात. या सर्वांचा परिणाम म्हणजेच एकंदरीत मुस्लिमांचं जीवनच संशयास्पद बनविलं जातं. याचा परिणाम हा होतो की, मुस्लिमांच्या मनात न्यूनगंडाची भावना निर्माण होते. एकाच समाजात राहून हिंदू–मुस्लिम एकमेकांकडे संशयाच्या नजरेने पाहू लागतात. हिंदू बहुसंख्याक असल्यामुळे मुस्लिमांच्या मनात सतत भीतीचे वातावरण निर्माण होत असते. वातावरण कमालीचे संदिग्ध होते आणि याचा परिणाम मुस्लिमांच्या जीवनावर होतो. भारतीय समाजात एकोपा निर्माण करण्याच्या दृष्टीने ही परिस्थिती अडचण निर्माण करीत असते.

इ.स. 636 ला इस्लाम भारतात दाखल झाला. मुस्लिम आक्रमकांनी, धर्मप्रसारासाठी आलेल्या सूफींनी आणि मुस्लिम व्यापाऱ्यांनी इस्लामला भारतीय भूमीत रुजविण्याचे प्रयत्न केले. त्यामुळेच इस्लाम भारतभर पसरला. भारतीय समाजात इस्लाम भारतीय मानसिकतेनुसारच या भूमीत रुजला. भारतीयांसाठी इस्लाम हा परकीय धर्म होता. स्वाभाविकच येथील स्थानिक हिंदूच्या धर्मांतराने मुस्लिम समाजाला आकार आला. हिंदुधर्मीयांची जातीनिहाय व्यावसायिक स्थिती त्यांच्या समाजात होतीच; तीच स्थिती मुस्लिम झाल्यानंतरही कायम राहिली. त्यांचा धर्म बदलला मात्र व्यवसाय तोच राहिला. धर्म बदलला पण संस्कृती बदलली नाही. ''धर्मांतरित मुसलमानांच्या सांस्कृतिक भिन्नतेमुळेच तर त्यांची जगभर हिंदवी मुसलमान म्हणून ओळख आहे तर भारतातले मुसलमान भारतातल्या प्रदेशाच्या नावाने ओळखले जातात. कारण भूगोलाचा संस्कृतीशी दृढ संबंध असतो.'[5] धर्माने मुस्लिम असला तरी तो हिंदूचे सण–समारंभ साजरे करतो. गणपती उत्सव आणि दिवाळीत रममाण होतो. त्याचे समाजजीवन संबंधित प्रदेशातील हिंदूंच्या समाजजीवनाशी मिळतेजुळतेच आहे. त्याचे आचारविचार, रूढी–परंपरा, श्रद्धा–अंधश्रद्धा या हिंदूसारख्याच आहेत. ''मारुतीच्या पाया पडल्याशिवाय ते तालीमच्या हौदात उतरत नाहीत. हिंदूच्या आदिदैवतांना म्हणजे म्हसोबा, आंबाबाई, मसाई, यल्लमाआई, लक्ष्मी, ताई–काई इत्यादींना नारळ फोडतात.''[6] अशी ही प्रादेशिकतेनुसार बदलणारी, हिंदू–मुस्लिम समन्वयातून निर्माण झालेली गंगा–जमुनी संस्कृती भारतातील मुस्लिम आचरणात आणताना दिसतात.

भारतातील मुस्लिम हे बहुतांशी धर्मांतरित मुस्लिम आहेत, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. भारताच्या प्रत्येक मुसलमानाच्या शरीरात जे रक्त आहे ते त्यांच्या मुसलमान पूर्वजांचे नव्हतेच. या पार्श्वभूमीवरही अन्य देशांतून आलेले इस्लामी मतप्रवाह मुस्लिमांनी जसे स्वीकारले तसेच भारतीय तत्त्वाचाही स्वीकार आवश्यक होता, तसा तो झालेला दिसत नाही. त्यांनी मुख्यत्वे इस्लामी अन्यदेशीय परंपरा व धर्मकथा यातूनच प्रेरणा घेतली. म्हणूनच त्यांच्या सांस्कृतिक परंपरेत भारतातील प्राचीन महापुरुषांचा समावेश होताना दिसत नाही. भारतीय इतिहास आणि परंपरा यांच्याशी समन्वय झाल्यामुळे जी ताकद भारतीय मुस्लिमांना मिळू शकली असती ती इतिहासाचा स्वीकार न केल्यामुळे मिळाली नाही. '' भारताच्या प्राचीन इतिहासाचा स्वीकार न केल्यामुळे भारतीय मुसलमानांचा सांस्कृतिक वारसा कमकुवत झाला.'[7] कदाचित याच कारणामुळे गेली कित्येक शतके भारतात हिंदू आणि मुस्लिम एकत्र राहात असूनही त्यांच्यात समन्वय प्रस्थापित होऊ शकला नाही.

कुराणाचा किंवा पैगंबरांच्या वक्तव्याचा त्यांनी दिलेला आधार घेऊन धर्मप्रचारक सांगतात की, आमच्यात जातिभेद नाहीत व पंथभेदही नाही. इस्लाम धर्मात सर्व माणसे सारखी आहेत. इस्लाम धर्मात जन्मजात श्रेष्ठ–कनिष्ठपणा आणि धार्मिक उच्चनीचतेला स्थान नाही. ''पण प्रत्यक्ष व्यवहारात ही समानता आढळत नाही. महमंद पैगंबरांच्या अनुयायांत विविध कारणांमुळे मतभेद होऊन शिया, सुन्नी आणि त्यांचे पुन्हा शेकडो उपपंथ निर्माण झाले आहेत.''[8] या पंथांमध्ये विषमता असूनही ते परस्परांविषयी द्वेषमूलक भावनेतून वागताना दिसतात. भारतीय मुसलमानांतही 'अशराफ' आणि 'अजलाफ' असे दोन वर्ग आढळतात. परदेशातून आलेल्या उच्च वंशाच्या मुसलमानांचा आणि भारतातील उच्च जातीतील धर्मांतरित मुस्लिमांचा समावेश अशराफ या वर्गात होतो. सैय्यद, पठाण, कुरेशी, मलिक, शेख या मुस्लिमांचा समावेश अशराफ गटात होतो. अधिकाराच्या जागा याच वर्गाला दिल्या जातात. 'अजलाफ' हा 'अशराफ' पेक्षा कमी दर्जा असलेला गट होय. अजलाफ म्हणजे हलके

लोक. हिंदूंच्या दलित जातीतून मुस्लिम झालेल्या लोकांचा यात समावेश होतो. मुस्लिम समुदायात हा गट संख्येने अधिक मोठा आहे. 'अरजाल' नावाचा तिसरा वर्गही मुस्लिम समाजात आढळतो. उच्चवर्णीय मुसलमान यांच्याशी कुठलाही संबंध ठेवीत नाही. अशा प्रकारे मुस्लिम समाजातही उच्चनीचता आणि जन्मजात श्रेष्ठ–कनिष्ठपणा आढळतो. 'इस्लाम धर्मात सर्व माणसे सारखी आहेत' हे विधान म्हणूनच विरोधाभासी वाटतं.

आजच्या मुस्लिम समाजासमोर अनेक समस्या आवासून उभ्या आहेत. जातिव्यवस्थेतील उतरंड हीसुद्धा मुस्लिम समाजातील एकतेच्या मार्गातील गंभीर समस्या आहे. महाराष्ट्रातील शेख, सैय्यद, पठाण, खान यासारख्या मुसलमानांचा वर्ग सोडला तर बहुसंख्य मुसलमानांची समाजरचना हिंदू समाजरचनेसारखीच आहे. ही वस्तुस्थिती सर्वप्रथम मंडल आयोगाने भारतीय पातळीवर स्पष्ट केली. ''महाराष्ट्र सरकारनेदेखील नोव्हें. 1994 मध्ये आदेश काढून ओ.बी.सी. सवलतीच्या यादीत 36 मुस्लिम जाती–जमातींचा समावेश केला. म्हणजे मुस्लिम समाजात जातिव्यवस्था असून मागास व इतर मागास जाती–जमातीदेखील आहेत, हे स्पष्ट होते.''[9] या 36 जाती–जमातीमध्ये मोमीन, नदाफ, कुरेशी खाटिक, धोबी, सुत्तार, अत्तार, जोहरी, कुम्हार, फकीर, जुलाहा, पिंजारा, छप्परबंद, दर्जी, तेली, भंगी अशा मागास जातींचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेली मुस्लिम ओ.बी.सी.ची यादी मुस्लिम समाजाचे अंतरंग उघड करते. मुस्लिम समाजाचे वास्तव यावरून उघड होते. या जातींनी इस्लाम स्वीकारला असला तरी हा समाज भारतीय जातिव्यवस्था स्वीकारणारा समाजच आहे. हिंदू समाजात जातिव्यवस्थेसोबत असलेली उच्च–नीचतेची वागणूक या सामाजातही अस्तित्वात आहे. या पार्श्वभूमीवरही मुस्लिम समाजातील मुल्ला–मौलवी इस्लाममधील समतेचे गुणगान करीत असतात याचे आश्चर्य वाटते. कदाचित ही सारी विषमताधिष्ठित समाजरचना इस्लामच्या भारतीय समाजाच्या संपर्कातून निर्माण झालेली असेल. तरीही वस्तुस्थिती नाकारणे म्हणजे आत्मवंचना करणे होय. मुस्लिम समाजाला ही वस्तुस्थिती स्वीकारूनच यापुढची वाटचाल करावी लागणार आहे.

मागासलेपणा ही मुस्लिम समाजाची मूलभूत समस्या आहे. ते मागासलेपण सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व आरोग्यविषयक अशा सर्वच क्षेत्रांत दिसून येते. मुस्लिम समाजाने आजपर्यंत इतर अल्पसंख्याक भारतीय समाजाबरोबर थोडीफार प्रगती केलेली आहे. हे स्वीकारूनही इतर अल्पसंख्याक समाजाशी मुस्लिम समाजाची तुलना केल्यास हा समाज शैक्षणिक प्रगती करण्यात इतर अल्पसंख्याक समाजाच्या मागे राहिलेला आहे. ही वास्तविकता पटकन नजरेसमोर उभी राहते. हे वाढणारे अंतर कमी करायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. म्हणूनच कॉ.पानसरे म्हणतात – ''मुस्लिमांना खरी गरज आणि जास्त गरज मशिदींची नाही; तर शाळा–कॉलेजची आहे.''[10] शिक्षणाशिवाय आधुनिकतेशी हा समाज आपलं नातं प्रस्थापित करू शकणार नाही. आर्थिक प्रगती करू शकणार नाही तसेच लोकशाही प्रक्रियेत त्याचा सहभागही वाढणार नाही. एकंदरीत मुस्लिम समाजाचा आर्थिक, सामाजिक, बौद्धिक विकास साधायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशात सर्वांत मोठा अल्पसंख्याक समाज अशिक्षित, गरीब आणि अविकसित राहणे परवडणारे नाही हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

शिक्षणाच्या संदर्भात हा समाज नेहमीच उदासीन राहिलेला आहे. शिक्षणाच्या संदर्भातील ही उदासीनता आपल्या मुलाचे शिक्षणाचे माध्यम कोणते असावे? या प्रश्नापासूनच सुरू होताना दिसते. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी की उर्दू असावी या समस्येपासूनच सुरुवात होते. पण उर्दूतून शिक्षण द्यायचं झालं तरी प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील उर्दू माध्यम सहज उपलब्ध होत नाही. उच्च शिक्षणासाठी तर उर्दू हे माध्यम अधिकच दुरापास्त होते. पुढे शिक्षण अधिकच कठीण होऊन बसते. मुस्लिम मुलांच्या शिक्षणासाठी मक्तब आणि मदरसा हया दोन संस्था आजही कार्यरत आहेत. मक्तब म्हणजे मशिदीला जोडून असलेली शाळा. यामध्ये ''शालेय शिक्षणाबरोबरच मुला–मुलींना सकाळी किंवा संध्याकाळी, केवळ एक तास धार्मिक ग्रंथाचे वाचन आणि पठन करता यावे यासाठी त्यांना अरबी भाषेतील कुराण शिकविले जाते.''[11] मक्तबमध्ये अशा प्रकारे धार्मिक शिक्षणाबरोबर शालेय शिक्षणही घेता येते. मदरशामध्ये मात्र दिवसभर फक्त कुराण व धर्माचे शिक्षण दिले जाते. आपल्या मुलाला इस्लाम धर्म समजावा, आपले समाजजीवन व संस्कृती याचेही ज्ञान त्याला मिळावे या उद्देशाने ही मुलं या शाळांमध्ये पाठविण्यात येतात. मदरशातून बाहेर पडलेली मुलं आजही समाजात मानाचे स्थान प्राप्त करण्यात यशस्वी झालेली आहेत. परंतु एकंदर मुस्लिम समाजात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता पारंपरिक शिक्षणाचे हे पर्याय खूपच अधुरे वाटतात. मुस्लिम समाजातील केवळ तीन–चार टक्के मुलेच या मदरशांमधून शिक्षण घेतात. बाकीची मुलं भारतात चालविल्या जाणाऱ्या अनुदानप्राप्त सरकारी शाळांमधून किंवा अनुदानप्राप्त

खाजगी शिक्षण संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांमधून शिक्षण घेत असतात. शिक्षणाच्या या सोयी असतानाही बारावीपर्यंतचे शिक्षण केवळ पन्नास टक्के मुले पूर्ण करतात. ''तसेच कॉलेज शिक्षणातील पुढचा टप्पा केवळ 26 टक्के मुस्लिम मुले पूर्ण करतात.''[12] म्हणजेच मुस्लिम समाजात शिक्षण घेणाऱ्यांची संख्या इतर अल्पसंख्याक समाजाच्या तुलनेत कमी आहे. मुस्लिमांपेक्षा अनुसूचित जाती–जमातींमधील शिक्षण घेणाऱ्यांची संख्या अधिक आहे. मुस्लिमांपेक्षा इतर गटात शिक्षणविषयक जागृती झालेली दिसून येते.

व्यक्तीचा सामाजिक आणि आर्थिक स्तर विकसित करण्यात शिक्षण हे प्रभावी माध्यम आहे. शिक्षणाशिवाय कुठलाही समाज विकासाचा पुढचा टप्पा गाठू शकणार नाही. आधुनिक काळात शिक्षणाची अपरिहार्यता जशी समाजाच्या इतर गटांनी ओळखली त्याप्रमाणेच मुस्लिम समाजाला ती आत्मसात करावी लागेल. यासाठी केवळ मदरसा शिक्षण हे पर्याय होऊ शकत नाही. यासाठी नियमितपणे चालणाऱ्या आणि सरकारी अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शाळा हा चांगला पर्याय होऊ शकतो. हे मुस्लिम समाजाने लक्षात घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय मदरशांमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा–महाविद्यालयाशी जोडून घेता येईल. अशा प्रकारची व्यवस्था करणेही आवश्यक आहे. मदरशांमधून आधुनिक शिक्षण मिळालं पाहिजे, सरकारी आणि खाजगी अनुदानप्राप्त शाळांमध्ये मुस्लिम मुलांचं शिक्षण घेण्याचं प्रमाण वाढलं पाहिजे. नोकरीच्या संधी ज्या क्षेत्रातून उपलब्ध होतात, त्या क्षेत्रातील स्पर्धा परीक्षांना ही मुलं यशस्वीपणे पास करू शकतील एवढं ज्ञान त्यांना मिळालं पाहिजे. शिक्षणाचं माध्यम उर्दू असून चालणार नाही तर त्यासाठी मातृभाषा किंवा आंग्लभाषा यातूनही शिक्षण घेतलं पाहिजे. अशी व्यवस्था निर्माण करणे आणि त्यासाठी सरकारवर दबाव तयार करणे ही जबाबदारीही शेवटी मुस्लिमांची आहे. त्याशिवाय आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात मुस्लिम समाजाचं भवितव्य सुरक्षित होणार नाही.

भारतात मुस्लिम समाजाविषयी अनेक गैरसमज प्रचलित आहेत. या गैरसमजामुळेच आणि भ्रांतिष्ट वातावरणामुळे मुस्लिम समाजाचं वास्तव चित्र अधिक संदिग्ध होत जाताना दिसते. यातला सर्वांत मोठा गैरसमज म्हणजे मुसलमान हे परके आहेत. त्यांची संस्कृती परकी आहे. ''वास्तविकता ही आहे की, भारतीय मुसलमान समाज हा 98 टक्क्यांनी स्थानिक आहे. तो धर्मांतरित आहे. वांशिक.दृष्ट्याही तो इथलाच आहे.''[13] कारण आज भारतात राहात असलेल्या मुस्लिमांपैकी बहुतांश मुस्लिम हे धर्मांतरित मुस्लिम आहेत. यातील काही बळजबरीने तर काही प्रलोभनांना बळी पडून मुस्लिम झालेले आहेत. बहुसंख्य मुसलमान इथल्या चातुर्वर्ण्याला कंटाळून धर्मांतरित झालेले आहेत. त्यांची संस्कृतीही इथल्या प्रस्थापित संस्कृतीच्या संकरातूनच तयार झालेली आहे. ही वास्तविकता लक्षात घेतली की मग मुस्लिम परके आहेत या गैरसमजाचा बुरखा गळून पडतो आणि वास्तव सत्य आपल्यासमोर उघड होते.

मुसलमानांना पटकन तलाक देता येतो. ते अनेक बायका करू शकतात आणि त्यांची लोकसंख्याही यामुळे भरमसाठ वाढत आहे, असे गैरसमज मुस्लिम समाजाविषयी अन्य धर्मीय माणसांच्या मनात जाणीवपूर्वक पसरविले जातात. हे निखालस खोटे असतात. मुस्लिम समाजामध्ये तलाक नाही असे म्हणता येत नाही. त्यांचे अवास्तव चित्रण जसे रंगविले जाते तसे ते निश्चितच नाही. इतर समाजामध्ये बायकोला टाकून देण्याचा जो रोग आहे त्याच प्रकारे तो मुस्लिम समाजातही आहे. मुस्लिम समाजात तर ''उलट दुसरी बायको करायची असेल तर पहिलीची संमती घेतली पाहिजे असे बंधन आहे.''[14] याचाच अर्थ पटकन तलाक देता येतो आणि झटकन दुसरे लग्न करता येते हे विधान अतिशयोक्त आहे. मुस्लिमांना दोन किंवा चार बायका असल्यामुळे त्यांची लोकसंख्या झपाट्याने वाढते आहे, हा एक खोटा भ्रम आहे. सत्य तपासले तर जाणवते की, लोकसंख्या वाढीचा दर बायकांच्या संख्येवर अवलंबून नसून संबंधित समाजातील गर्भधारणा करू शकणाऱ्या स्त्रियांच्या लोकसंख्येवर अवलंबून असतो. लोकसंख्यावाढीसाठी समाजाचा आर्थिक स्तरही कारणीभूत ठरत असतो. म्हणूनच मुसलमान समाजाची लोकसंख्या वाढत आहे काय? या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी आहे. परंतु लोकसंख्या वाढीचा हा दर या समाजाच्या बरोबरीने आर्थिक स्तर असणाऱ्या अन्यसमाजापेक्षा अधिक आहे काय? या प्रश्नाचे उत्तर निश्चितच 'नाही' असे आहे. ''लोकसंख्यावाढीसंबंधी अनेक अभ्यास झाले. समाजामध्ये गरिबी जास्त त्या समाजाच्या लोकसंख्यावाढीचा वेग जास्त असतो याबद्दल सर्व अभ्यासकांचे एकमत आहे.''[15] मुस्लिम समाजात दारिद्र्याने होरपळलेल्या आणि हातावर पोट घेऊन जगणाऱ्या मुस्लिमांची संख्या अधिक आहे. अनिश्चित उत्पन्नावर गुजराण करणाऱ्या या समाजाच्या लोकसंख्यावाढीचा वेग अनपेक्षित असला तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काय आहे? लोकसंख्यावाढीचा हा दर मर्यादित करायचा असेल तर मुस्लिम समाजाचा आर्थिक दर्जा सुधारावा लागेल. केवळ

लोकसंख्या वाढते आहे म्हणून भुई थोपटत राहिल्याने फारसे काही साध्य होणार नाही हे लक्षात घेणे आज आवश्यक आहे.

कुटुंब नियोजनाला मुस्लिम विरोध करतात असाही आरोप मुस्लिम समुदायावर करण्यात येतो. सुरुवातीला मुस्लिमांनी कुटुंब नियोजनाला विरोध केला हे खरे आहे. आजचे वर्तमान वास्तव लक्षात घेतले तर अनेक मुस्लिम कुटुंब नियोजनाच्या साधनांचा वापर करतात. अनेकांनी कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. या शस्त्रक्रिया करून न घेण्यात अंधश्रद्धा, अज्ञान, भीती यांचा वाटा दुर्लक्षित करता येत नाही. हे सुजाण नागरिकांनी समजून घेणे गरजेचे आहे. केवळ धर्मामुळे असा विरोध होतो आहे, असे समजणे मुळात चुकीचे आहे. त्यातही पुन्हा ''कुटुंब नियोजनाला विरोध म्हणजे संख्या वाढवून हा देश परत काबीज करण्याच्या इराद्याने होय असे आपले म्हणणे अतार्किक वाटते.''[16] ज्यांचे जीवन

मुसलमान हे मुळातच आक्रमक आणि हिंसक असतात. मुद्दाम हेतुपूर्वक पसरविलेला हा एक भ्रम आहे. ''बऱ्याच वेळेला स्वातंत्र्यपूर्व काळात आणि नंतरही काही प्रसंगी मुस्लिमांचे वर्तन आक्रमक असते ही गोष्ट खरी आहे.''[17] या आक्रमकतेची कारणेही तितकीच महत्त्वाची आहेत. मुळात अल्पसंख्याक असल्यामुळे असुरक्षिततेची भावना, त्यातून निर्माण होणारे मानसिक ताण, शिक्षणाचा अभाव आणि दारिद्र्य, हिंदुत्ववादी संघटनांकडून मिळणाऱ्या चिथावण्या, या साऱ्यांमधून त्याच्या अस्तित्वाचे प्रश्न, जीवनमरणाचे प्रश्न बनतात. दंगलींमध्ये जास्त संख्येनी मरणारी मुस्लिम माणसं, या साऱ्यांचा एकत्रिम परिणाम त्यांच्या आक्रमक वृत्तीत दिसून येतो. यात धर्माचा संबंध येत नाही. मुळात धर्मामुळे माणूस हिंसक आणि आक्रमक बनतो हे समीकरणच चुकीचे आहे, असे जर असते तर इतर धर्मीय माणसे तरी साधी, अहिंसक, शांतताप्रिय, सालस, जगावर प्रेम करणारी दिसली असती. हे दिसत नाही म्हणूनच धर्माचा आणि आक्रमकतेचा संबंध चुकीचा, निरर्थक आहे असे समजावे लागते.

मुस्लिम महिलांचे प्रश्न एकीकडे मुस्लिम समाजाच्या मागासलेपणाशी निगडित आहेत तर दुसरीकडे धार्मिक परंपरांशी बंदिस्त आहेत. मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न आजही ऐरणीवर आहेत. जरी ''इस्लाम हा जगातला पहिला असा धर्म आहे की, या धर्माने स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व आणि अस्मिता मान्य केली.''[18] तिला मुक्त आणि स्वतंत्र मानले तरी व्यावहारिक जीवनात ही परिस्थिती आढळत नाही. मुस्लिम समाजातील गरिबी, निरक्षरता, धार्मिक, कर्मठपणा आणि त्यातून येणारी रूढिशरणता या सर्वांचे दाहक चटके मुस्लिम स्त्रियांना सोसावे लागतात. ''ती दारिद्र्य, निरक्षरता, बेकारी, महागाई इत्यादी आर्थिक प्रश्नांनी ग्रासली आहे व सध्याच्या दहशतवादाच्या वातावरणाचे परिणामही तिला जास्त तीव्रतेने सोसावे लागत आहेत.''[19] अशा प्रकारे मुस्लिम महिलांची परिस्थिती दयनीय आहे. मुस्लिम महिला अल्पसंख्याक समाजातीलही अल्पसंख्याक असल्यामुळे धर्म, वर्ग आणि लिंगभाव या संदर्भातला विपरीत परिणाम स्त्रियांच्या आयुष्यावर झालेला आहे. शिक्षणाचा अभाव किंवा अपुरे शिक्षण यामुळे ही परिस्थिती अधिकच चिघळत जाताना दिसते.

''हिंदू स्त्रियांना कायद्याचे संरक्षण आहे तसे कायद्याचे संरक्षण मुस्लिम स्त्रियांना नाही.''[20] तोंडी तलाक, पुरुषांना पत्नीच्या संमतीने अनेक स्त्रियांशी लग्न करण्याची धार्मिक परवानगी, घटस्फोटामुळे उद्ध्वस्त झालेले संसार, स्वतच्या अर्थार्जनाला असेलल्या मर्यादा, यामुळे मुस्लिम स्त्री–जीवनाची ही शोकांतिका अधिकच कारुण्पूर्ण होत जाते. आजच्या विज्ञानयुगातही तिला दुय्यम समजले जाते. ''बायकोच्या संमतीशिवाय नवऱ्याला तिच्याशी फारकत घेता येत नाही. हा कुरआनच्या एका आज्ञेने दिलेला अधिकार 'फारकत घेताना कारणे सांगण्याची जबाबदारी नवऱ्याची नाही' या दुसऱ्या आज्ञेने काढून घेतला आहे.''[21] याचा अर्थ तिला दिलेला हा धार्मिक अधिकार केवळ नाममात्र आहे. एवढेच नाही तर पतीच्या निधनानंतर लगेच तिला 'मेहर' माफ करावा लागतो. म्हणजेच ती धार्मिक दृष्टीने स्वतंत्र नाही. शहाबानो केसमध्ये तिच्या पतीने तिला तलाक दिला. त्यानंतर इंदूर कोर्टमध्ये तिने पोटगीसाठी अर्ज केला. 1985 ला न्या.चंद्रचूड यांनी घटस्फोटित मुस्लिम महिलेस पोटगी घेण्याचा हक्क आहे असा ऐतिहासिक निर्णय दिला. या निर्णयाविरोधात मुल्ला–मौलवींनी आमच्या धार्मिक जीवनात हस्तक्षेप होतो म्हणून आरडाओरडा केला. शेवटी 1986 'मुस्लिम महिला विधेयक ' लोकसभेत मांडले गेले. काँग्रेसने व्हिप वापरून ते पासही करून घेतले. या राजकारणाचे दूरगामी परिणाम मुस्लिम महिलांच्या जीवनावर होतील याचे भान भारतीय राजकारण्यांना राहिले नाही. मुस्लिम स्त्री या कायद्यामुळे पुन्हा पोरकी, अनाथ आणि असहाय झाली. पोटगीचा तिचा हक्क गेला. तलाकपीडितेची जबाबदारी वक्फ बोर्ड व माहेरकडील नातेवाईक यांच्यावर सोपविण्यात आली. अगोदरच दारिद्र्याने पिचलेला मुस्लिम समाज आपल्या तलाकपीडित नातेवाईक स्त्रीची जबाबदारी कशी घेणार? परिणामत मुस्लिम स्त्री निराधार झाली. तिला कायद्याचे संरक्षण राहिले नाही.

ग्रामीण मुस्लिम स्त्री तर अजूनही गुलामगिरीतच आहे. आजही तिला वाटते की, सवत आणणे हा नवऱ्याचा अधिकारच आहे. तिला धार्मिक शिक्षणही नाही आणि आधुनिक शिक्षणही नाही. ती अंधश्रद्धाळू आणि रूढिप्रिय आहे. तिचा भुताखेतांवर आणि गंड्यादोऱ्यांवर विश्वास आहे. तिचे हे जीवन सर्वसामान्य भारतीय ग्रामीण स्त्रीसारखे आहे. या पार्श्वभूमीवर म्हणूनच फ.म.शहाजिंदे म्हणतात – ''याशिवाय मुस्लिमांमध्ये स्त्रियांना वारसाहक्क आहे. बालविवाह नाही. विधवा विवाह आहे हेही स्त्रीच्या समर्थनार्थ सांगता येईल. तरी पण गुलामीपासून संरक्षण देणाऱ्या माझ्या इस्लाममध्ये स्त्रीचा दर्जा जंगम मालमत्तेपेक्षा जास्त नाही ही एक ज्वलंत वस्तुस्थिती आहे. ''[22] हा अभिप्राय मुस्लिम स्त्रियांच्या संदर्भात वास्तव वाटतो.

'मुस्लिम सत्यशोधक मंडळ', 'हुकूक–ए–निस्वाँ', 'बेहराम सुधार कमिटी', 'महिला शक्ती मंडळ', 'समझोता महिला मंडळ' यासारख्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रबोधनातून आणि कार्यातून मुस्लिम महिला गुलामगिरीच्या पिंजऱ्यातून बाहेर पडताना दिसतात. आधुनिक शिक्षणामुळे महिलांमध्ये नवी जाणीव जागृती होत आहे. म्हणूनच आता ती बंद जबान बोलू लागलेली आहे. ती अवरुद्ध लेखणी स्त्रवू लागलेली आहे. सभा–संमेलनांच्या व्यासपीठांवरून ती बुलंद आवाजात गर्जू लागलेली आहे. परंपरावाद्यांचा विरोध आणि पुरोगामी विचारांचे स्वागत करीत ती स्त्रीमुक्तीची वाटचाल करीत आहे. म्हणूनच बुरखे आता कधी स्वेच्छेने तर कधी वैचारिकतेने गळत चाललेले आहेत. परंपरांच्या बेड्या कमजोर होत चाललेल्या आहेत. पण ही केवळ विशाल वाळवंटातील छोटीशी हिरवळ आहे. हाच भविष्यातील मुस्लिम स्त्रीचा नवा चेहरा आहे. तिचा प्रवास सुरू झालेला आहे. तिची पावले मुक्तीच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहेत, एवढे मात्र नक्की.

शेवटी एवढेच नमूद करावेसे वाटते की, मुस्लिम स्त्रियांच्या कल्याणाचा आणि प्रगतीचा विचार करताना उलेमा आणि त्यांची धर्मपीठे यांची भूमिकाही तपशिलाने समजून घेण्याची आवश्यकता आहे. तसेच आधुनिक काळातील गट्टा मतांचे राजकारण आणि त्यांच्या समाजविघातक खेळीही समजून घेण्याची गरज आहे. या दोन्ही गोष्टींचे सकारात्मक पोस्टमार्टम केल्याशिवाय मुस्लिम स्त्रियांच्या प्रबोधनाच्या आणि परिवर्तनाच्या चळवळीला योग्य दिशा आणि गती मिळू शकणार नाही. मुस्लिम स्त्रियांच्या सुखी जीवनाचे मार्ग यामधून उत्क्रांत होताना दिसतात. शेवटी मुंबईतील मुस्लिम स्त्रियांवरच्या करण्यात आलेल्या संशोधनात 'अमरीन' नावाची स्त्री मुस्लिम स्त्रीजीवनाची व्यथा मांडताना म्हणते, ''असुरक्षिततेची भावना आणि सामाजिक दबाव यामुळे महिला शिक्षणात मागास आहेत. आमच्या पुढाऱ्यांनीही काही केलं नाही. सरकारला आमची फिकीर नाही आणि आमचा समाज तर आम्हाला गृहीतही धरत नाही.''[23] अमरीनच्या शब्दांत साठवलेलं वास्तव हेच मुस्लिम स्त्रीचं दुखद वर्तमान आहे.

सद्यकाळात मुस्लिम समाजाचा प्रवास हा संक्रमणकालीन समाजाचा प्रवास आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात विविध संप्रदायांमध्ये काश्मीरचा न सुटलेला गुंता, मुंबई आणि भारतीय संसदेवर झालेले दहशतवादी हल्ले', भारताच्या सार्वभौम प्रजासत्ताकाला दिली जाणारी आव्हाने. या सर्वांमुळे मुस्लिम समाज संशयाच्या, भीतीच्या आणि दहशतीच्या वातावरणात जगत आहे. यामध्ये दिलासा एवढाच की, प्रबोधनाच्या चळवळीची पावले सामाजिक दिशादर्शनाचे काम प्रामाणिकपणे करीत आहेत. धर्ममार्तंडांच्या फतव्यांच्या विरोधात हा समाज क्षीण का होईना पण प्रतिक्रिया नोंदवू लागला आहे. बुरख्याच्या अस्तित्वावर प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. सांप्रदायिक सद्भावाचे महत्त्व आता या समाजाला कळू लागले आहे. उद्याच्या शांततापूर्ण समाजाचे स्वप्न आजच्या या प्रक्रियेतून अस्तित्वात येण्याची चिन्हे दिसू लागलेली आहेत.

सांप्रदायिक सद्भावनिर्मितीच्या प्रक्रियेत सर्वांत मोठा अडथळा वाढता दहशतवाद आहे. त्याचा मुखवटा जरी धार्मिक वाटत असला तरी प्रत्यक्षात तो तसा नाही. अनेक कारणे दहशतवादाला खतपाणी घालत असतात. '' भारतात दहशतवादी कारवायात गुंतलेले बहुतांश अतिरेकी हे मुस्लिम असल्यामुळे व त्यांचे संबंध पाकिस्तानसारख्या शत्रुराष्ट्रांशी सिद्ध झाल्यामुळे भारतातील बहुसंख्य हिंदूंच्या मनात असे गृहीतक आहे की हे हल्ले फक्त पाकिस्तानच घडवून आणते''[24] यामुळे मुस्लिमांविषयीच्या द्वेषाची भावना अधिक तीव्र होते. परंतु दहशतवाद धार्मिक कमी आणि राजकीय व आर्थिक अधिक आहे. हे भारतीय जनतेने समजून घेतल्यास हिंदू– मुस्लिम समाजातील तणाव अधिक निवळत जाईल. सामाजिक ऐक्य निर्माण करण्यास त्यामुळे मदत होईल. उद्याच्या शांततामय समृद्ध भारताचे चित्र यातून आकारास येईल. भारताचा महासत्ता होण्याचा मार्ग कदाचित अधिक प्रशस्त होईल अशी आशा करायला हरकत नाही.

## संदर्भ टिपा :–

(1)http:/www.indiaonlinepages.com/population/muslim-papulation-in-india.htm,Dt.. 30 / 03 / 2015
(2) नामदेव ''बदलता परिदृश्य, मुस्लिम समाजपर केंद्रित हिंदी उपन्यास (अप्रकाशित प्रबंध), सन 1947 ते अबतक (2006)'',जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय. पृ. 105
(3) सारथी अरुण''हिंदू–मुस्लिम वैमनस्याची ऐतिहासिक मीमांसा'', अस्मिता प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2003 पृ. 49
(4) शहाजिंदे फ.म.तांबोळी फारुख (संपा.)''मुस्लिम मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप'', भूमी प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती, 2014 पृ. 152
(5)शहाजिंदे फ.म. (संपा.)''मराठी साहित्यात मुस्लिम–मराठी कवितेची भूमिका'', मराठी काव्यसृष्टीत मुस्लिम कविंची भूमिका (चर्चासत्राची स्मरणिका, 12 जानेवारी, 2013), प्राचार्य एस.एस.गर्ल्स कॉलेज, गोंदिया, 2013पृ. 1
(6) बेन्नूर प्रा. फक्रुरुद्दीन ''अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषद पत्रिका'', 1992 पृ. 4
(7)काळे अक्षयकुमार (संपा.) '' साप्रदायिक सदभाव आणि सामाजिक शांतता '' (कुलगुरू डॉ. श. नु. पठाण गौरव ग्रंथ ), ग्लोबल हेल्थ केअर ॲण्ड एज्युकेशन फाऊंडे''ान, पुणे , प्रथमावृत्ती, 2011 पृ. 24
(8)जोशी महादेवशास्त्री (संपा.)'' भारतीय संस्कृतिकोश, सातवा खंड'', भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती, 1972 पृ. 440
(9)बेन्नूर फक्रुरुद्दीन'' भारतीय मुस्लिमांची समाजरचना आणि मानसिकता'', प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, प्रथमावृत्ती, 1995पृ. 34
(10)पानसरे गोविंद''मुस्लिमांचे लाड'', ए.एस.वैद्य, महाराष्ट्र कौन्सिल, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मुंबई, दुसरी आवृत्ती, 1993पृ. 35
(11)नाईक महंमदगौस हाजी''सच्चर का सच'' (सच्चर समिती अहवाल), मुस्लिम समाज प्रबोधन व शिक्षण संस्था, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, 2007पृ. 16
(12)तत्रैवपृ. 15
(13)शहाजिंदे फ.म.''अनुभव'', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1997पृ. 17
(14)पानसरे गोविंदउ.नि. पृ. 06
(15)हबीब अमर''खुल्या व्यवस्थेत मुसलमानांचे भवितव्य'', परिसर प्रकाशन, अंबाजोगाई, प्रथमावृत्ती, 2007पृ. 09
(16)शहाजिंदे फ.म.''अनुभव'', उ.नि.पृ. 17
(17)बेन्नूर प्रा. फक्रुरुद्दीन'' भारतीय मुस्लिमांची समाजरचना आणि मानसिकता'', उ.नि.पृ. 82
(18)मुकादम कादर अब्दुल'' ारतीय मुस्लिम समाजाचे अंतरंग'', एकता सांप्रदायिक सौहार्द समिती, मुंबई, प्रथमावृत्ती, 2003पृ. 05
(19)नानिवडेकर मेधा''महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा'', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2006पृ. 171
(20)तत्रैवपृ. 106
(21) शहाजिंदे फ.म.''अनुभव'', उ.नि.पृ. 69
(22) तत्रैवपृ. 66
(23) आपटे ज.श.,नियाझ नूरजहाँ सफिया (संपा.)''मोकळ्या श्वासाच्या शोधात'', मनोविकास प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2015 पृ. 71
(24)काळे डॉ. अक्षयकुमार(संपा.)उ.नि. पृ. 20